पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**

P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र. ३०५१** **दि. २१/०९/२०१९**

**दत्तवाडी पोलीस ठाणे**

**दत्तवाडी गणपती विसर्जन घाटावरील सी सी टी व्ही कॅमेरे चोरणारे चोरटयांना दत्तवाडी पोलीसांनी २ तासातच केले जेरबंद**

पुणे शहरामध्ये गणेश उत्सवाचे अनुशंगाने महानगर पालीकेने पुणे शहरात येणारे गणेश भक्तांचे सुरक्षेच्या दृष्टीने वेगवेगळया विसर्जन मिरवणुक मार्गावर व विसर्जन घाटावर सी सी टी व्ही कॅमेरे बसविले होते व त्याचे काम आयसिक्युअर पावर टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेट कंपनीस देण्यात आले होते. कंपनीने पानमळा वसाहत ते दत्तवाडी येथील विसर्जन घाट या मार्गावरही सी सी टी व्ही कॅमेरे बसविले होते. ते कॅमेरे गणपती विसर्जन होईपर्यंत सुरक्षीत होते त्यानंतर नमुद कॅमेरे काढुन घेण्याचे काम सदर कंपनीकडुन चालु होते. विसर्जन घाट येथे बसविलेले तीन सी सी टी व्ही कॅमेरे त्यांना मिळुन आले नाहीत म्हणुन ते चोरी झाले असलेबाबत खात्री झालेनंतर कंपनीचे मॅनेजर विलास श्रीराम कोल्हे, वय. ५३ वर्षे, रा. फ्लॅट नं. १०३, आसावरी सोसायटी, नांदेड सिटी, पुणे यांनी सदरबाबत दत्तवाडी पोलीस ठाणे येथे तक्रार तक्रार दिली .

दत्तवाडी पोलीस ठाणेचे तपासपथकाचे पोलीस उपनिरिक्षक कुलदिप संकपाळ व पो. हवा. तानाजी निकम, राजु जाधव, पो. ना. महेश गाढवे, सोमेश्वर यादव, पो. कॉ. विकास कदम, अक्षयकुमार वाबळे, नवनाथ भोसले, अमित सुर्वे, शरद राऊत व अमोल लोहार यांनी लागलीच फिर्यादी यांचेबरोबर जावुन तेथे असणारे इतर सी सी टी व्ही फुटेज पाहीले असताफुटेज मध्ये एका टाटा एसीई या चारचाकी गाडी वर चढुन एक जण सी सी टी व्ही कॅमेरे काढताना व ते काढलेले कॅमेरे खाली गाडीमध्ये पुढे बसलेले दोन जण ताब्यात घेताना दिसुन येत असुन कॅमेरे काढल्यानंतर ती तिघेही गाडीत कॅमेरे ठेवुन गाडी घेवुन जाताना दिसुन येत असल्याचे त्यांना दिसुन आले त्यामुळे त्यांनी सदर गाडीचा शोध घेणेकामी हनमघर घाट दत्तवाडी येथे गेले असता सदर गाडी तेथेच उभी असल्याचे पोलीसांना दिसुन आली सदर गाडी वापरणारे इसमाचा शोध घेतला असता सदर गाडी वापरणारा इसम हा दत्तवाडी पुणे येथील रोहन कांबळे व त्याचा भाऊ अक्षय कांबळे हे असल्याचे समजले त्यावेळी त्यांचे राहते घरी जावुन त्यांचा शोध घेतला असता ते त्यांचे राहते घरी मिळुन आले नाहीत. त्यावेळी पोलीसांनी त्यांचे वडील विजय कांबळे यांचेकडे त्यांचे फोटो पाहुन घेतले.

त्यानंतर पोउनि कुलदिप संकपाळ व त्यांची वरील टिम ही माघारी येत असताना त्यांचे बरोबरील पो. शि. वाबळे व पो. शि. भोसले यांना खास बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, “रोहन कांबळे व त्याचा भाऊ अक्षय कांबळे हे त्यांचा मित्र लक्ष्मण जेटपाल याचे बरोबर सध्या निलायम ब्रीजचे पुढे, जनता वसाहत कॉर्नर येथे असलेल्या पानटपरीजवळ थांबले असुन त्यांनीच हनमघर विसर्जन घाटावरील सी सी टी व्ही कॅमेरे चोरले आहेत.” अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने त्यांनी ती पोउनि कुलदिप संकपाळ यांना कळवली असता पोउनि कुलदिप संकपाळ हे तत्काळ वरील स्टाफसह निलायम ब्रीजचे पुढे, जनता वसाहत कॉर्नर येथे जावुन थोडे आडबाजुस थांबुन पाहणी केली असता नमुद रोहन विजय कांबळे व त्याचा भाऊ अक्षय विजय कांबळे हे त्यांचे एका मित्रासोबत तेथे असणारे पानटपरीजवळ कोणाची तरी वाट बघत थांबलेले असलेले त्यांना दिसुन आले. त्यावेळी त्यांनी वरील स्टाफचे मदतीने सापळा रचुन नमुद तिघांनाही अत्यंत शिताफीने जागीच पकडले व त्यांना त्यांचे नाव पत्ता विचारता त्यांनी आपली नावे १) रोहन विजय कांबळे वय. २६ वर्षे, रा. २३०, मदर तेरेसा गार्डनजवळ, दत्तवाडी पुणे २) अक्षय विजय कांबळे २३ वर्षे, रा. सदर व ३) लक्ष्मण प्रकाश जेटपाल, वय. २८ वर्षे, रा. स.नं. १२६, आंबेडकर वसाहत, दत्तवाडी, पुणे अशी असल्याची सांगीतली. त्यावेळी पोलीसांनी त्यांना दत्तवाडी पोलीस ठाणे येथे आणुन त्यांचेकडे दाखल गुन्हयाचे अनुशंगाने तपास केला असता त्यांनी प्रथम उडवाउडवीची उत्तरे दिली परंतु त्यांना नंतर पोलीसांनी त्यांचेकडील प्राप्त फुटेज दाखविले असता त्यांनी दाखल गुन्हा केल्याचे कबुल केले असुन त्यांना दाखल गुन्हा दाखल झाले पासुन अवध्या दोनच तासात दाखल गुन्हयात अटक करण्यात आले आहे. तसेच त्यांनी चोरलेले वर नमुद तीन सी सी टी व्ही कॅमेरेही त्यांचेकडुन हस्तगत करण्यात आले आहेत.

सदरची कारवाई ही दत्तवाडी पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक देविदास घेवारे व पोलीस निरिक्षक (गुन्हे) राजेंद्र सहाणे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे प्रभारी पोलीस उपनिरिक्षक कुलदिप संकपाळ व पो. हवा. तानाजी निकम, राजु जाधव, पो. ना. महेश गाढवे, सोमेश्वर यादव, पो. कॉ. विकास कदम, अक्षयकुमार वाबळे, नवनाथ भोसले, अमित सुर्वे, शरद राऊत व अमोल लोहार यांनी केली आहे. तसेच दाखल गुन्हयाचा पुढील तपास हा पोलीस उपनिरिक्षक कुलदिप संकपाळ दत्तवाडी पोलीस ठाणे पुणे शहर हे स्वतः करी आहे.